महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक

प्रशिक्षणार्थी पोलीस उप निरीक्षक (सरळ सेवा)- सत्र-108

अंतीम परिक्षा

पेपर क्र. **IX** — मंगळवार - **27/08/2013**

विषय - गुन्हे तपास (प्रात्याक्षिक) — वेळ - **15.00 ते 18.00**

**Investigation (Practical)** — गुण - **100**

************************************************************************

**सुचना-** अ. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. -- All questions are compulsory.

ब. प्रश्नांचे गुण त्यासमोर दर्शविले आहेत. -- Marks for each question are indicated there-against.

क. वाचनीय अक्षरात लिहावे. शब्द-मर्यादा पाळावी. -- Write legibly. Abide by word limit.

ड. फक्त निळया/काळया बॉलपेनचाच वापर करावा. -- Use blue/black ball point pen only.

इ. मुख्य उत्तरपत्रिकेतील पृष्ट क्र.2 वर काहीही लिहू नये -- Do not write anything on page 2 of main answer sheet.

************************************************************************

**गुण / Marks**

प्र. 1 (1) महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा-1999 अन्वये कारवाई करणे पुर्वी कलम 23 (1) अन्वये खालील पैकी कोणत्या दर्जाहून कमी नसलेल्या अधिकाऱ्याची पूर्व परवानगी घ्यावी? **(01)**

(अ) पोलीस अधीक्षक (क) पोलीस महानिरीक्षक

(ब) पोलीस उप महानिरीक्षक (ड) अपर पोलीस महासंचालक

प्र-1 (2) महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा 1999 चे कोणत्या कलमान्वये आरोपीचा कबुली जबाब नोंदविता येतो. **(01)**

(अ) कलम 19 (क) कलम 17

(ब) कलम 16 (ड) कलम 18

प्र-1 (3) भौतिक दुवे सील करताना खालील पैकी कोणत्या वस्तुचा वापर करावा? **(01)**

(अ) डिंक (क) लाख

(ब) शेंदुर (ड) डांबर

प्र-1 (4) घटनेच्या किती तासानंतर रक्ताचे नमुने नष्ट होऊ शकतात? **(01)**

(अ) 72 (क) 48

(ब) 24 (ड) 12

प्र-1 (5) आरोपीची ओळखपरेड घेणे आवश्यक असेल तर खालील पैकी कोणती गोष्ट करणे आवश्यक आहे? **(01)**

(अ) आरोपींचे फोटो पेपरमध्ये छापणेसाठी देणे (क) आरोपींचे नातेवाईकांना बोलावून घेणे.

(ब) आरोपींची त्याच्या गावातून धिंड काढणे. (ड) आरोपीचा चेहरा झाकणे.

प्र-1 (6) खालीलपैकी कोणत्या सॅम्पलवरुन विषप्रयोग निश्चीत करता येईल. **(01)**

(अ) पादत्राणांचे ठसे (क) कापलेली नखे.

(ब) बीडीचे थोटुक (ड) अंतर्वस्त्रे

प्र-1 (7) फौजदारी कायद्यान्वये (Cr.P.C.) तपास करणाऱ्या पोलीस अंमलदारास कोणत्या कलमान्वये तपासातील कोणतीही वस्तू ताब्यात घेणेचा अधिकार आहे? **(01)**

(अ) कलम 126 (क) कलम 176

(ब) कलम 167 (ड) कलम 169

प्र-1 (8) खालीलपैकी कोणता पदार्थ अफू पासून तयार करण्यात येतो? **(01)**

(अ) चरस (क) मॉर्फीन

(ब) गांजा (ड) हेरॉइन

प्र -1(9) अंमली पदार्थ व्यवसायातून मिळविलेली मालमत्ता जप्त करण्याचे आदेश न्यायालयाकडून NDPS या कायद्याच्या कोणत्या कलमान्वये प्राप्त करुन घ्यावेत? (01)

(अ) कलम 64 (क) कलम 68

(ब) कलम 65 (ड) कलम 70

प्र-1 (10) गुन्हा उघडकीस न आल्यास कोणता अंतिम अहवाल फॉर्म पाठवावा? (01)

(अ) MOB फॉर्म (क) ब फॉर्म

(ब) अ फॉर्म (ड) इ फॉर्म

प्र -2 संजय राजाराम पाटील वय 28 वर्षे, रा. भिवंडी यास सराईत गुन्हेगार रामू पाटील याने बेदम मारहाण केल्याची एन.सी तुम्ही ठाणे अंमलदार म्हणून दाखल करुन घेतली आहे. (एन सी क्र. 20 दिनांक 29.07.13) सदर एन.सी चा तपास करणेसाठी [कलम 155 (2) नुसार] मेट्रोपोलिटन न्याय दंडाधिकारी यांची संमती मिळणेसाठी पत्र लिहा. (20)

**(200 शब्द )**

प्र -3 **खालील परिच्छेद वाचून प्रश्नांची उत्तरे द्या.**

- २६-६-२०१३ अंदाजे १०.०० वाजेच्या सुमारास **गोजरबाई पाटील** वय ५० व तिची मुलगी **सविता पाटील** वय २६ रा. **भीमताल** हया गोजरबाई यांच्या शेतातील वांग्याच्या पिकात निंदणी करत होत्या. त्या दिवशी सकाळी १०.१५ च्या सुमारास वसंत पाटील वय २८ हा गोजरबाई हिच्या शेतात आला (वांग्याच्या पिकात). त्यावेळी सविताही निंदणी करीत होती वसंतने त्याच्या खिशातून चाकू काढून रागाच्या भरात सविताला जमिनीवर ढकलून मला धोका कां दिला? असे म्हणून तिच्या पोटावर चाकूने ५ ते ६ वार केले. गोजरबाई पाटील, जिच्यासमोर सदर घटना घडली. तिने वसंतला सविताला मारु नकोस म्हणून गयावया केली. त्यावर वसंतने चिडून गोजरबाई हिस धमकी दिली की "तू मध्ये पडू नकोस, नाही तर तुलाही ठार मारेन. तरीसुध्दा गोजरबाईने त्याला रोखण्याचा प्रयत्न केला. वसंताने गोजरबाईवर चाकूने वार केला. पण ती झटकन बाजूला सरकल्याने तिच्या उजव्या हातावर जखम झाली. गोजरबाईने आरडाओरड केली. त्यावेळी ही आरडाओरड ऐकून रस्त्याने जाणारा रामराव तिकडे जाऊ लागला, तेव्हा त्याला पाहून वसंत चाकू सहित घटनास्थळावरुन पळून गेला. चाकूने झालेल्या जखमांनी रक्तबंबाळ झालेली सविता मृत्युमुखी पडली.
- सविता आणि वसंत यांचे सुमारे ३ वर्षापासून प्रेमसंबंध होते. वसंत हा बेरोजगार होता व त्याला सविताशी लग्न करावयाचे होते. परंतु तिच्या आईवडिलांच्या सांगण्यावरुन नोकरी असलेल्या मुलाशी लग्नास तिने होकार दिल्यामुळे व वसंत सोबत लग्नास नकार दिल्याने वसंत यास तिचा राग होता. रागाच्या भरात त्याने सवितावर चाकूने हल्ला करुन तिचा खून केला. ही घटना गोजरबाई पाटील यांच्या समोर त्यांचे वांग्याचे शेतात घडली. घटनेनंतर गोजरबाई पाटील ही तात्काळ **दि.२६/०६/२०१३** रोजी पोलीस स्टेशन भीमताल येथे गेली आणि सदर घटनेची तक्रार नोंदवली. गोजरबाईने नोंदविलेल्या तक्रारीच्या आधारावर भीमताल येथे आरोपी विरुध्द गु.नं.१००/१३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.
- तुम्ही भीमताल पो.स्टे.चे पोलीस उप निरीक्षक आणि गुन्हयाचे तपासी अधिकारी आहात. तुम्ही घटनास्थळाचा पंचनामा आणि सविताच्या मृतदेहाचा इंन्क्वेस्ट पंचनामा केला. घटनास्थळी मिळालेल्या वस्तू म्हणजे फुटलेल्या बांगडयांचे तुकडे, साधी माती, रक्तमिश्रीत माती, खुरपे इ. जप्त केल्या व त्या रासायनिक विश्लेषकांकडे अभिप्रायार्थ पाठविण्यात आल्या. सविताचा मृतदेह शवविच्छेनासाठी पाठविण्यात आला. आरोपी सुमारे २ महिना फरार होता. त्यास दि.२६/०८/२०१३ रोजी पकडण्यात येऊन त्याच दिवशी अटक केली. त्यांचेकडे केलेल्या चौकशी अंती त्याने गुन्हयात वापरलेले हत्यार काढून देतो असे सांगितल्यावरुन त्याचेकडून ते हत्यार पंचनाम्याद्वारे जप्त करण्यात येऊन ते रासायनिक विश्लेषकांकडे पाठविण्यात आले.

प्र-3 (अ) घटना प्रत्यक्ष पाहणारी व जखमी श्रीमती गोजरबाई पाटील, वय 50वर्षे, रा. भीमताल हिचे कडुन प्राप्त तक्रारीचे आधारे प्रथम खबरी अहवाल लिहा. (20)

**(275 शब्द)**

प्र-3 (ब ) मयत सविता पाटील, वय 26 वर्षे, रा. भीमताल हिचे प्रेताचा इन्क्वेस्ट पंचनामा तयार करा. (15)

**(200 शब्द)**

प्र-3 (क) मयत सविताचे शव परिक्षणासाठी (शवविच्छेदनासाठी) जिल्हा शल्य चिकित्सकांकडे पाठविण्याचा पोलीस अहवाल तयार करा. (10)

**(150 शब्द)**

प्र-3 (ड) आरोपी वसंत पाटील,वय 26 वर्षे,रा. भीमताल यांचा अटक पंचनामा तयार करा. **(200 शब्द)** (10)

प्र-3 (इ) अटक केलेल्या आरोपीकडून हस्तगत केलेल्या गुन्हयात वापरलेल्या हत्यारांचा पंचनामा (मेमोरेंडम पंचनामा) लिहा. (15)

**(300 शब्द)**